# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- १९५-२२** **दिनांक :- ३०/०६/२०२२**

## सोन्याच्या दागिन्यांचा अपहार करुन पळुन गेलेल्या सोनारास अटक - एकुण ३६ तोळे २७२ मिलीग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात नालासोपारा पोलीस ठाणेस यश

दिनांक ०२/०४/२०२२ रोजी फिर्यादी नामे सौ. पुष्पा केवट यांनी नालासोपारा पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दिली की, त्यांनी नालासोपारा पश्चिम येथील खुशबु ज्वेलर्सचे मालक रामसिंग भवरसिंग कितावत यांचेकडे काही दिवसांपुर्वी त्यांचे ६२ ग्रॅम १९० मिलीग्रॅम वजनाचे २,७९,०००/- किंमतीचे सोन्याचे दागिने विश्वासाने गहाण ठेवले होते. दिनांक १८/०३/२०२२ रोजी खुशबु ज्वेलर्सचे मालक रामसिंग भवरसिंग कितावत हे त्यांचे दूकान बंद करुन पळुन गेल्याचे समजले. फिर्यादीप्रमाणेच इतर १६ लोकांच्या सोन्याच्या दागिन्यांचा अपहार करुन फसवणुक करुन पळुन गेल्याचे निदर्शनास आल्याने फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I १२५/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४२०,४०६ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नमुद गुन्हयातील फिर्यादी व साक्षीदार यांची झालेल्या फसवणुकीचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास सुरु केला. घटनास्थळावरील प्राप्त पुरावे व तांत्रिक माहितीच्या आधारे गुन्हयाचा तपास केला असता गुन्हयातील आरोपी हा राजस्थान येथे त्याचे मुळ गावी असल्याची माहिती मिळाली. आरोपीबाबत अधिक माहिती प्राप्त करुन आरोपी नामे रामसिंग भवरसिंग कितावत रा. वाडावावडी, जि.राजसंमद राज्य-राजस्थान यास दिनांक २१/०६/२०२२ रोजी राजस्थान येथून ताब्यात घेवून अटक करण्यात आली. अटक आरोपीताकडे अधिक तपास करता त्याने सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली दिली. आरोपीकडे अपहार केलेल्या दागिन्याबांबत चौकशी केली असता त्याने सदरचे दागिने हे इतर सोनाराकडे गहाण ठेवल्याचे सांगुन सदर गुन्हयातील अपहार झालेल्या दागिन्यापैकी एकुण ३६ तोळे २७२ मिलीग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०३, श्री. चंद्रकांत जाधव, सहा. पो.आयुक्त नालासोपारा, श्री.विलास सूपे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, नालासोपारा पोलीस ठाणे, श्री.राहुल सोनावणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/पंडीत मस्के, अमोल तळेकर, पोहवा/आदिनाथ कदम, किशोर धनु, पोना/सचिन कांबळे, पोशि/सचिन मोहिते, राजेश नाटुलकर, पोना/ढोणे ( नेमणुक-पोलीस उप आयुक्त कार्यालय ) यांनी केलेली आहे



------------ooooooo---------------